# 'मराठीच्या अस्तित्वाची चिंता नको'




## पुरस्कारविजेते

- निबंधलेखन : १) सूरदास भोसले २) मयूर कदम ३) ज्योती नायर
- अभिवाचन : १) मयूर कदम २) ज्योती नायर ३) नीती तामसे
- घोषवाक्य : १) नभा शिरोडकर २) ज्योती नायर ३) सागर लिपणे ४) उमेश पेठे
- कवितालेखन : १) नभा शिरोडकर २) ज्योती नायर ३) कुशल नेहेते ४) रूपेश वानखेडे
- प्रश्नमंजुषा - १) प्रशांत शिंदे २) रूपेश वानखेडे ३) भारत कांबळे ४) महेश कुमार डांगे

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

मराठीतील कला, संस्कृती आणि साहित्य अतुलनीय आहे आणि कोणालाही आज किंवा भविष्यात तिच्या अस्तित्वाची चिंता करण्याची गरज नाही. इंग्रजी भाषेची भीती ही जगात सर्वत्र आहे. कारण ही व्यापारी भाषा आहे. मात्र तिचे कौतुक इतर भाषांप्रमाणे नाही. जोपर्यंत संस्कृती आहे, तोपर्यंत मराठी भाषेला मरण नाही. प्रत्येकाने स्वतःतील न्यूनगंड बाजूला सारत भरपूर वाचन करावे, दर्जेदार नाटक व चित्रपट पाहावेत. आपली भाषा जपणे ही आपली वैयक्तिक जबाबदारी आहे, असे प्रसिद्ध कलाकार सुभाष अवचट यांनी सांगितले.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे आयोजित मराठी भाषासंवर्धन पंढरवड्याचा समारोप नुकताच पार पडला. यावेळी चित्रकार व ज्येष्ठ साहित्यिक सुभाष अवचट बोलत होते. मराठी भाषासंवर्धन पंढरवड्यानिमित्त निबंधलेखन, घोषवाक्य, कवितालेखन, अभिवाचन, प्रश्न मंजुषा अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्या होत्या.

या स्पर्धांमध्ये मराठी व अमराठी भाषिक कर्मचाऱ्यांच्या नोंदवलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादासाठी मुंबई मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल यांनी विजेत्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.